# ना. शरद पवारांविरोधात एल्गाराची वेळ आली आहे

**सं पा द की य**

**सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**

**सादर करीत आहेत**



महाराष्ट्राचा 'जाणता राजा' शरद पवार यांनी आज इमूपालन केलेल्या शेतकऱ्यांना जबरदस्त धक्का दिला. हा धक्का केवळ इमूपालन शेतकऱ्यांसाठीच नाही. महाराष्ट्रातल्या सर्व शेतकऱ्यांसाठी हा धक्का आहे. या धक्क्यातून शेतकऱ्याला सावरायचे असेल तर आंदोलनाशिवाय पर्याय नाही. ज्यांना 'जाणता राजा' असे आपण आपुलकीने आणि आदराने म्हणतो त्या शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या विरोधात महाराष्ट्राच्या शेतकऱ्याला एल्गार करण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारच्या धोरणांमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. शेतीमालाला हमीभाव मिळावा, अशी मागणी करण्याची शेतकऱ्यांवर वेळ आली आहे. त्यासाठीही या अन्नदात्याला रस्त्यावर उतरून गोळ्या खाव्या लागतात. हा शेतकरी मोठ्या आशेने केंद्रात असलेल्या आपल्या जाणत्या राजाकडे पाहू लागला तेव्हा शरद पवार म्हणाले की, नुसती शेती करून भागणार नाही. शेतीबरोबर जोडधंदा करा आणि एका मुलाला शहरात नोकरीला पाठवा. पण शेतकऱ्याला हे सांगण्याची गरजच नव्हती. त्याला हे सांगण्याआधीच त्याने हतबल होऊन आपले लेकरू शहराकडे पाठविण्यास सुरुवात केली. गावाकडे काही एकराची जमीन असलेल्या शेतकऱ्याचे लेकरू शहरातील फूटपाथवर झोपू लागले. आज महाराष्ट्राची ही स्थिती आहे. शेतकरी शेतीतून उद्ध्वस्त झाला आणि त्याचा पोरगा शहरात कंत्राटी कामगार म्हणून कणाकणाने यातना भोगू लागला.

शेतीबरोबर जोडधंदाही बिचाऱ्या शेतकऱ्यांनी सुरू केला. पण त्यासाठी कसलीच मदत मिळत नाही. परिणामी कोंबडी पालनाच्या पुढे कुणी जाऊच शकला नाही. काहींनी इमूपालन सुरू केले. पण आज त्यांची रडायची वेळ आली आहे. इमूपालन शेतकरी शरद पवारांकडे मदत मागायला गेला तर आज शरद पवारांनी हात वर करून सरळ त्याला सांगितले, भोग तुझ्या कर्माची फळे! म्हणजे जाणता राजा उपदेशाचे डोस पाजणार आणि शेतकरी त्याचे भोग भोगणार!

शरद पवार साहेब म्हणाले की, शेतीला जोडधंदा करा म्हणून काहींनी इमूपालन सुरू केले. जिल्हा बँक, ग्रामीण बँका, खाजगी बँका अशी सर्वच यंत्रणा शेतकऱ्यांच्या मागे लागली. या बँकाच इमूपालन प्रशिक्षणाची शिबिरे घेऊ लागल्या. इमू हा ऑस्ट्रेलियन पक्षी आहे. आपल्या शेतकऱ्यांनी हा पक्षी बघितलाही नव्हता. बँक अधिकाऱ्यांना तरी त्याची कशाला माहिती असणार आहे? पण नाबार्डने २००४ साली 'इमूपालनाची आदर्श योजना' असा अधिकृत अहवालच प्रसिद्ध केला. एन.यू. कुरकुरे, महाप्रबंधक, नाबार्ड अशी अहवालावर सही आहे. नाबार्डचे 'इमूपालन आदर्श योजनेचे' परिपत्रक बँकांना गेले आणि त्यांच्या या परिपत्रकावरून बँकांनी इमूपालनासाठी कर्जवाटप योजना केली. नाबार्डच्या परिपत्रकामुळे आम्ही ही योजना केली अशी बँकांची पत्रं आहेत. नाबार्डचे महाप्रबंधक कुरकुरे हे तर स्वतः ठिकठिकाणी जाऊन इमूपालनावर लेक्चर द्यायचे.

त्यानंतर सरकारशी संबंधित मिटकॉन आणि एमसीइडी यांनी इमूपालन प्रशिक्षण वर्ग सुरू करून शेतकऱ्यांना सर्टिफिकेट दिली. सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्धविकास) यांनी इमू पालन व्यावसायिक सहकारी संस्था नोंदणीचे निकष ठरविले. महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी इमूपालन माहितीची पुस्तिका काढली. इमू सहाय्यक केंद्र (महाराष्ट्र राज्य) 'फायदेशीर इमूपालन करा' अशी पत्रकं निघाली. इतके सर्व झाल्यावर हा फायदेशीर व्यवसाय आहे असे शासनच सांगते आहे, यावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी सोने-नाणे, घर, जमीन गहाण टाकून इमूपालन सुरू केले. यात त्यांचे काय चुकले?

मात्र काही वर्षांतच हा व्यवसाय पूर्ण ठप्प झाला. इमूपालन हा फायदेशीर व्यवसाय तर नव्हताच, पण तो व्यवसाय म्हणूनच मूळात फसवा आहे. हे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. इमूपालन करणारे सर्वच शेतकरी अडचणीत आले. महाराष्ट्रातच नव्हे तर तामिळनाडू, आंध्र प्रदेश येथील इमू शेतकरीही असेच फसले जाऊन उद्ध्वस्त झाले आहेत. आता या शेतकऱ्यांनी करायचे काय? जमीन, पैसा सर्व यासाठी गहाण ठेवले. मिळकत काहीच नाही आणि बँका वसुलीसाठी मागे लागल्या आहेत.

महाराष्ट्रात या शेतकऱ्यांची जबाबदारी घ्यायला कुणी तयार नाही. पशुसंवर्धन मंत्री मधुकर चव्हाण यांना जिल्हा परिषद, सातारा पशुसंवर्धन विभागाची इमू पालनाचे गोडवे गाणारी पुस्तिका दाखवली तर ते म्हणतात की, त्याचा आमच्या खात्याशी संबंध नाही. ती पुस्तिका त्यांच्या पातळीवर काढली. पण मग त्यावर 'पशुसंवर्धन विभाग' ही अक्षरे कशी?

'नाबार्ड'कडे दाद मागितली कारण त्यांच्या पुस्तकावरून बँकांनी कर्ज दिली तर 'नाबार्ड'चे जनरल मॅनेजर ए.डी. रत्नू म्हणाले की, आम्ही योजना करीत नाही. आम्ही पाहणी करीत नाही. केंद्र सरकारच्या कृषी खात्याकडून आमच्याकडे योजना येतात. त्याची आकडेवारी खोलीत बसून आम्ही करतो आणि देतो. त्यामुळे इमूपालन योजना ही आमची नसून केंद्रीय कृषी खात्याची आहे. इतके सांगून 'नाबार्ड'ने जबाबदारी झटकली. इमू शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे पत्र मात्र 'नाबार्ड'ने केंद्रीय कृषी खात्याकडे पाठविले.

मुंबईत विधानभवनात इमू पालनविषयी झालेल्या बैठकीच्या वृत्तांतात नाबार्डचे महाप्रबंधक प्रविण घोले यांचे वाक्य आहे की, केंद्र शासनाच्या १६ फेब्रुवारी २००५ च्या निर्णयानुसार ही योजना राज्यात राबविण्यात आली.

आता केंद्रीय कृषी खातेच आपल्याला दिलासा देईल, असे इमू शेतकऱ्यांना वाटू लागले. कारण या खात्याचे मंत्री ना. शरद पवार आहेत. पण दुर्दैव असे की, शरद पवार यांनी आपली जबाबदारी अगदी पूर्णच झटकून टाकली. आपल्या महाराष्ट्रातील शेतकरी आहे. तो भिकेला लागला आहे. तो आर्थिक अडचणीत आहे. त्याच्यासाठी काहीतरी मार्ग काढू हे शब्द कानावर पडतील, असे वाटले होते. पण शरद पवारांनी सरळ सांगितले की, ही योजना आम्ही आणलेली नाही. त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली नाही. त्यामुळे या योजनेशी आमचा काही संबंध नाही. 'नाबार्ड'ने आमच्या खात्याकडे पाठविलेला प्रस्ताव आम्ही फेटाळला आहे. शेतकऱ्यांनी अंडी विकून पैसे मिळविण्याच्या लालसेने हा धंदा केला असल्याने आम्ही दिलासा देऊ शकत नाही.

ना. शरद पवारांचा एकेक शब्द म्हणजे शेतकऱ्यांच्या पाठीवर आसूड ओढल्यासारखा होता. राज्य सरकार, नाबार्ड, कृषी खाते कुणीच शेतकऱ्याच्या या स्थितीला जबाबदार नाही? मग बँकांनी कुणाच्या शब्दावर ही योजना आणून कर्जवाटप केले? शेतकऱ्यांनी लालसेपोटी धंदा केला असे म्हणता येईल? चार पैसे जास्त मिळावे म्हणून जमीन गहाण टाकून सरकारने प्रसिद्धीस आणलेला जोडधंदा केला तर त्याला लालसा म्हणायची? हेच शरद पवार साखर कारखान्यांना काही हजार कोटींची कर्जमाफी देतात. हेच शरद पवार बुडीत गेलेल्या जिल्हा बँकांना जीवीत करण्यासाठी कोट्यवधींची पॅकेजेस मंजूर करतात. हे सर्व कोणत्या कायद्यात, कोणत्या नियमात आणि कोणत्या बजेटमध्ये बसते? राजकीय नेते भ्रष्टाचार करून आणि स्वतःची पोटे भरून साखर कारखाने कर्जात डुबवतात आणि सहकारी बँकांचे भांडवल लुटून ऐय्याशी करतात. अशांना का सांगत नाही की, या आमच्या योजना नाहीत आणि आमच्या बजेटमध्ये याची तरतूद नाही. हे बकासूर रोज एकाचा जीव घेतात आणि त्यांची भूक भागवायला ना. शरद पवार रोज एक गरीब जीव त्या बकासुरांसमोर टाकतात.

योजना, कागदपत्र, मंजुरी, बजेट या अंकगणितांच्या खेळापलीकडेही एक गणित असते ते म्हणजे माणुसकीचे गणित असते. भ्रष्टाचाऱ्यांच्या हजारो कोटींच्या उद्योगांना पॅकेज देणाऱ्या जाणत्या राजाकडे इमू शेतकरी फक्त दिलासा मागत होता. पण त्याला झिडकारण्यात आले. आता या शेतकऱ्याने काय करायचे? कोणता जोडधंदा करायचा? राजकारणात शिरून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घ्यायचा का? शरद पवारांनी एकेकाला उचलले आणि त्याला साखर कारखाने, शाळा, कॉलेज, पतसंस्था अशी सगळी कुरणे देऊन मोठे केले. स्वातंत्र्यानंतर देशातील ५४२ संस्थाने विलीन केली. पण शरद पवारांनी महाराष्ट्रात जिल्ह्याजिल्ह्यात राष्ट्रवादीच्या नेत्यांची संस्थाने उभी केली. आता त्यांना शेतकरी दिसत नाही आणि मजूरही दिसत नाही. शेतकरी आचके देऊ लागला तरी त्याला कुणी हात द्यायला तयार नाही. 'आप'ला बाप आहे अन् आई आहे. शेतकऱ्याकडे एकच मार्ग आहे. आता एल्गाराची वेळ आली आहे.